पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. २७ दिनांक १८/०४/२०२६

अपघातांना आळा बसणे व नागरीकांमध्ये वाहतुक नियमांची जनजागृती व्हावी याकरीता पालघर पोलीस दलाचा अनोखा उपक्रम

पालघर जिल्हा पोलीस दला अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखेचे कामकाज हे श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. रविंद्र नाईक, पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीतपणे सुरु असून पालघर पोलीस दलाकडून वाहतुकीचे नियमन व सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत आहेत.

भारतामध्ये दरवर्षी सुमारे १.५० लाख नागरिकांचा रस्ते अपघातांमध्ये मृत्यू होतो. या पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालयाने अपघातातील मृत्यूदर कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याअनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून सन २०२२ मध्ये जिल्हा वाहतूक शाखेची स्थापना करण्यात आली असून अपघातांवर नियंत्रण मिळविणे तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरुकता निर्माण करणे यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनामार्फत प्राप्त साहित्याच्या सहाय्याने जिल्हा वाहतूक शाखेकडून सपोनि/अनिल व्हटकर, प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डहाणू, बोईसर, पालघर, वाडा, विक्रमगड व जव्हार या शहरांमध्ये नागरिकांच्या नजरेस सहज पडतील अशा प्रमुख ठिकाणी एकूण ८ एलईडी स्क्रीन बसविण्यात आल्या आहेत.

या स्क्रीनद्वारे नागरिकांना खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सूचना प्रसारित करण्यात येत आहेत.

- वाहन चालविताना सीटबेल्टचा वापर करा.
- दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करा.
- ट्रिपल सीट वाहन चालवू नये.
- मद्यपान करून वाहन चालवू नये.
- तसेच इतर आवश्यक वाहतूक नियमांची माहिती.

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जागरुकता वाढून रस्ते अपघातांमध्ये घट होण्यास मदत होणार आहे.

जिल्हा वाहतूक शाखेकडून नागरिकांचा प्रवास सुरक्षित, सुकर व विनाअडथळा होण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. सर्व नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून पोलीस विभागास सहकार्य करावे, असे श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे.